■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343

R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक ४६ ● मंगळवार, दि. ७ ते १४ एप्रिल २०२६ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.


# माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव राज्यव्यापी अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ





**मुंबई, दि. ७ : जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला.**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. राज्य शासनाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण

## उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्र्यासह मंत्रिमंडळाची उपस्थिती

महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा संकल्प केला आहे.

लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यासारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. माता-बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आले आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून, ठरावीक निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना आरोग्यसंपन्न गाव म्हणून गौरविण्यात येणार आहे.

यासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच आरोग्य संस्थांना ६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव हे अभियान केवळ योजना नसून एक लोकचळवळ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्याचा स्तर उंचावून निरोगी, सशक्त आणि समृद्ध समाज घडविण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

# हनुमान जयंतीनिमित्त महाप्रसादाचे वितरण



**रिसोड-** स्थानिक बसस्थानक परिसरातील हनुमान मंदिरात २ एप्रिल रोजी हनुमान जयंतीनिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते . या महाप्रसाद कार्यक्रमाला शहरातील भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत हजारोच्या संख्येने उपस्थिती लावली. सकाळी लवकर मंदिरात अभिषेक आणि आरतीचा कार्यक्रम आरती मंडळाच्या वतीने पार पडला. यावेळी मंडळाच्या सदस्यांनी भक्तिभावाने हनुमान जयंती साजरी केली. पहाटेपासूनच मंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी उसळली होती. दुपारी १२ वाजल्यापासून सुरु झालेल्या महाप्रसादाचा लाभ सायंकाळपर्यंत अनेक भाविक

भक्तांनी लाभ घेतला. या कार्यक्रमासाठी रिसोड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष भगवानराव क्षीरसागर, आमदार अमित झनक, नगरपालिका चे मुख्याधिकारी सतीश शेवदा, विविध राजकीय व व्यापारी क्षेत्रातील मान्यवर, तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाप्रसादाचे आयोजन हनुमान आरती मंडळ, तसेच एस टी महामंडळ सदस्यांच्या सहकार्याने करण्यात आले कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले. (वि. प्र)

# अवकाळी पावसासह गारपीटीने 'हळद' पिकाचे नुकसान

### कु-हा, आसोला येथिल शेतकऱ्यांचे नुकसान

रिसोड: रिसोड तालुका हा हळद पिकाचे उत्पन्न घेणारा तालुका म्हणून पुढे येत आहे. विशेष म्हणजे कु-हा, आसोला, जवळा, मांडवा, मोहजाबंदी, भर जहागीर सह आदी गावातील शेतकरी वन्यप्राण्यांच्या त्रासाला कंटाळून हळद पिकाकडे वळले आसतांनी हळद पिक शेतावर सुकण्यावेळीच ता. २ एप्रिल च्या रात्री झालेल्या आवकाळी पावसासह, गारपीटीने सुकत आसलेल्या हळदीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

तालुक्यातील शेतकरी पारंपारिक पिक पध्दतीला बगल देत नानाविध पिकाची लागवड करीत आहे. परंतु कधी



आसवानी, तर कधी सुलताणी संकटाने येथिल शेतक-यांचे हिरवे स्वप्न धुळीस मिसळत आसल्याचे विदारक चित्र दिसुन येते. मागील काही दिवसांपासून अवकाळी पावसाचा अंदाज खरा ठरला पणे नेमका हळद पिकाच्या मुळावरच आला. तालुक्यातील कु-हा, आसोला, भर जहागीर, मांडवा, जवळा, मोहजाबंदीसह आदी भागातील शेतक-यांनी हळद पिकाची काढणी करून योग्य ती प्रक्रिया करीत शेतावर हजारो क्विंटल हळद सुकण्यासाठी पांगुण ठेवली होती. परंतु ता. २ एप्रिल च्या रात्री अनेक गावा मध्ये अवकाळी

> वन्यप्राण्यांच्या त्रासापोटी आमच्या परीसरामध्ये हळद पिकाकडे शेतकरी मोठ्या प्रमाणात वळले, हळद पिकाची काढणी करीत शेतावर पसर पडलेल्या हळदीवर अवकाळी पावसासह, गारपीट झाल्याने आता हळद पांढरी पडलेली दिसत आहे. याचा संबंधित विभागाने पंचनामा करून योग्य ती मदत करावी ही विनंती.
>
> देविदास नागरे
> हळद उत्पादक शेतकरी कुऱ्हा

पावसासह, गारपीट झाल्याने पिवळी हळद पांढरी पडल्याने अतोनात नुकसान झाल्याची माहीती. कु-हा येथिल शेतक-यांनी दिली. या नुकसानाची प्रशासनाद्वारे योग्य पंचनामे करीत नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

# राज्यात पेट्रोलियम पदार्थांचा पुरेसा साठा; एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी शासनाची व्यापक उपाययोजना

मुंबई, दि. ६: राज्यात पीएनजी जोडण्यांची संख्या २५.३६ लाखांवर पोहोचली असून एका महिन्यात ७३ हजार नवीन जोडण्या देण्यात आल्या आहेत. सीजीडी पाईपलाईनसाठी 'शशाशव झशऑळीीळेप' देण्याचा निर्णय घेतल्याने नेटवर्क विस्ताराला गती मिळणार आहे. ज्या ठिकाणी पीएनजी नेटवर्क पोहोचलेले आहे त्याठिकाणी ग्राहकांनी त्यासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. ज्या भागांमध्ये पीएनजी पाईपलाईन टाकणे शक्य नाही त्या ठिकाणी एलपीजीचा पुरवठा पूर्ववत सुरू राहणार असून महाराष्ट्रात एलपीजी, पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिली.

मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत अपर मुख्य सचिव डिग्गीकर यांनी ही माहिती दिली. यावेळी शिधा नियंत्रक चंद्रकांत डांगे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, 'पीआयबी'च्या महासंचालक स्मिता वत्स-शर्मा, तेल उत्पादक राज्य समन्वयक उमेश कुलकर्णी, भारत पेट्रोलियम कार्पोरेशन, कृषी संचालक सुनिल बोरकर यांच्यासह संबंधित उपस्थित होते.

पीएनजी व सीजीडी नेटवर्कला चालना

मध्यपूर्वेतील सध्याच्या भू-राजकीय तणावामुळे पेट्रोलियम पदार्थांच्या पुरवठा साखळीवर काही प्रमाणात दबाव निर्माण झाला असला, तरी राज्यातील पुरवठा सुरळीत असल्याचे सांगून अपर मुख्य सचिव डिग्गीकर म्हणाले की, जिथे जिथे शक्य आहे तिथे पीएनजीचा वापर वाढवण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी पाईप लाईन गॅस पुरवठा शक्य आहे. त्या ठिकाणी ३० जून पर्यंत पीएनजी बंधनकारक असून ज्या भागांमध्ये पीएनजी पाईपलाईन टाकणे शक्य नाही त्या ठिकाणा एलपीजीचा पुरवठा पूर्ववत सुरू राहणार आहे. पीएनजी कनेक्शन ज्या भागांमध्ये उपलब्ध तिथे त्याचा वापर वाढवायचा असून ग्राहकांच्या दृष्टीने विचार करता पीएनजी स्वस्त असून त्याचे देशांतर्गत उत्पादन जास्त आहे. पीएनजी नेटवर्क जिथे पोहोचले आहे तिथे तिथे ग्राहकांनी नोंदणी केली पाहिजे असे अपर मुख्य सचिव डिग्गीकर यांनी यावेळी सांगितले.

# पुन्हा चंद्रमाच्या दिशेने

५३ वर्षांनी मानवाने पुन्हा चंद्राच्या दिशेने पाऊल टाकले. यावेळी 'नासा'ची 'आर्टेमिस २' ही मोहीम आहे. या मोहिमेद्वारे अंतराळवीर चांद्रप्रदक्षिणा पूर्ण करून पृथ्वीवर परतणार आहेत. १९७२ मधील अपोलो १७ मोहिमेनंतर मानवी अंतराळ प्रवासाच्या इतिहासातील ही सर्वात लांबची आणि महत्त्वाची मोहीम मानली जात आहे.

फ्लोरिडा येथील केनेडी अंतराळ केंद्रातून 'स्पेस लॉन्च सिस्टम' (एसएलएस) या महाकाय रॉकेटच्या साहाय्याने ओरियन अंतराळयान अंतराळात झेपावले. यात कमांडर रीड वाईजमन यांच्या नेतृत्वाखालील पथकात पायलट व्हिक्टर ग्लोव्हर, मिशन स्पेशालिस्ट क्रिस्टीना कोच आणि कॅनेडियन अंतराळ संस्थेचे जेरेमी हॅन्सन यांचा समावेश आहे. क्रिस्टीना कोच यांच्याकडे आधीच सर्वात लांब एकल अंतराळ प्रवासाच्या विक्रमाची पार्श्वभूमी आहे. या मोहिमेद्वारे त्या चंद्राच्या कक्षेत पोहोचणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. हे चारही तज्ज्ञ चंद्राच्या 'फार साईड'चे म्हणजेच पृथ्वीवरून कधीही न दिसणाऱ्या भागाचे प्रत्यक्ष निरीक्षण करणार आहेत. ही मोहीम केवळ चांद्रप्रदक्षिणा नाही, तर भविष्यातील मंगळ मोहिमा आणि चंद्रावर कायमस्वरूपी मानवी वस्ती स्थापन करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा आधार ठरणार आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश मानवी अंतराळ प्रवासाच्या मर्यादा तपासणे आणि नवीन तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष वातावरणात चाचणी करणे हा आहे. आर्टेमिस-२ ही एक 'क्रूड फ्लायबाय' मोहीम आहे. याचा अर्थ असा की, अंतराळवीर चंद्राच्या पृष्ठभागावरउतरणार नाहीत, तर चंद्राच्या मागच्या बाजूने एक विस्तीर्ण वळण घेऊन पृथ्वीवर परततील. या दहा दिवसांच्या प्रवासात ओरियन यान पृथ्वीपासून सुमारे ३,९३,००० किलोमीटर अंतरापर्यंत मजल मारेल. हे अंतर अपोलो १३ मोहिमेने प्रस्थापित केलेला विक्रम मोडीत काढणारे ठरेल. हे यान पृथ्वीपासून २.३ लाख मैल दूर जाणार आहे. पण याचा खरा उद्देश ओरियन स्पेसक्राफ्टच्या जीवन प्रणालीचा अभ्यास करणे हा आहे. ही मोहीम काढण्यामागे मुख्य कारण आहे ते २००८ मध्ये नासाने चांद्रयान मोहीम काढली होती त्यात चंद्रावर पाणी असल्याचे पुरावे दिले होते. त्याची पडताळणी करण्यासाठी ही मोहीम आखली आहे. अर्थात यावेळी त्यांच्या मोहिमेचा उद्देश चंद्रावर जाऊन झेंडा उभारण्याचा नाही. तेव्हा अमेरिका आणि रशिया यांच्यात वैज्ञानिक वर्चस्वाची लढाई होती आणि त्यात वर्चस्व कोण राखते यावर प्राणपणाला लावून ती लढाई खेळली जात असे. पण आता तो काळ मागे पडला. रशियाही आता कोसळला आणि अमेरिका जगातील सर्वात बलवान राष्ट्र राहिले नाही. आर्टिमिस हे विज्ञान आणि भू-राजकीय संघर्षात वेगळे युगाचे प्रतिनिधित्व करते. चीन आणि अमेरिकन अंतराळ स्पर्धेत चंद्र हे एकमात्र अग्रगण्य स्थान आहे. त्यासाठीच दोन्ही देशांचा संघर्ष आहे. आर्टेमिस हे जागतिक पवित्र्याबाबत व्यापक अंतराळ संशोधन आहे. या मोहिमेचा उद्देश अधिक व्यापक स्वरूपाचा आहे. चंद्रावर हिम सापडले होते आणि शास्त्रज्ञांचा अंदाज असा आहे, की चंद्रावर खड्डे आहेत आणि या हिमाचा उपयोग स्पेस स्टेशन बांधण्यासाठी करता येऊ शकतो का? तसेच चंद्रावर जीवरक्षक प्रणालीसोबत प्राणवायू आणि हायड्रोजन या वायूंचा उपयोग करून रॉकेट लाँचर्ससाठी त्यांचा उपयोग करता येईल का? पण या मोहिमेने अमेरिकेची या अंतराळ वर्चस्वातील दादागिरी पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे

# भगवान महावीर जयंती निमित्त आरोग्य शिबीर उत्साहात

रिसोड : आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, पुंडलीक नगर, देगावता. रिसोड जि. वाशीम येथे भगवान महावीर जयंतीचे पावन औचित्य साधून मोफत आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले. महिला उत्कर्ष प्रतिष्ठान (सेक्शन ८ कंपनी)च्या अध्यक्षा आ. भावनाताई गवळी तसेच आयुर्वेद महाविद्यालयाचे मार्गदर्शक शैलेशजी कतुरवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला.

ग्रामीण व गरजू रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शेकडो रुग्णांनी शिबिरात सहभागी होऊन आपली आरोग्य तपासणी करून घेतली. या वेळी अनुभवी आयुर्वेद तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची सखोल तपासणी करण्यात आली व त्यांना योग्य ते औषधोपचार व जीवनशैलीविषयक मार्गदर्शन देण्यात आले. शिबिरामध्ये विशेषतः वातविकार, पोटाचे विविध आजार, डोळ्यांचे विकार, त्वचारोग तसेच महिलांमध्ये आढळणारे स्त्रीरोग यांसारख्या



अनेक आजारांवर निदान व उपचार करण्यात आले. आयुर्वेदाच्या माध्यमातून नैसर्गिक उपचारपद्धती व आरोग्य जपण्याचे उपाय याबाबत रुग्णांना सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच संतुलित आहार, दिनचर्या व ऋतुचर्या यांचे महत्त्वही उपस्थितांना समजावून सांगण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे व्यवस्थापक नरेश नळदकर, प्रतिक रेवणवार, विवेक उपलेंचवार, भुजंगराव जाधव तसेच प्राचार्य डॉ. रघुनाथ राऊत यांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण नियोजनबद्ध पद्धतीने शिबिर पार पडले. शिबिर यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच रुग्णालयीन कर्मचाऱ्यांनी अत्यंत मेहनत घेतली. रुग्णांची नोंदणी, तपासणी, औषध वितरण आणि समुपदेशन या सर्व टप्प्यांमध्ये संघटित कार्यपद्धतीचे उत्कृष्ट उदाहरण पाहायला मिळाले. या शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत आणि सुलभ आरोग्यसेवा मिळाली असून त्यांच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढण्यासही मोठी मदत झाली. समाजोपयोगी अशा उपक्रमांमुळे आयुर्वेदिक उपचारपद्धतीवरचा विश्वास अधिक दृढ होत असल्याचे समाधान आयोजकांनी व्यक्त केले. ग्रा. प्र.



# शालेय विद्यार्थ्यांच्या आधार नोंदणीला गती द्या

## जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांचे प्रतिपादन

वाशिम : जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या आधार नोंदणी व अद्ययावत प्रक्रियेला गती देणे अत्यंत आवश्यक असून, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केलेजिल्हास्तरीय आधार मॉनिटरिंग समितीची बैठक त्यांच्याअध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ते बोलत होते.

बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार तसेच शिक्षणाधिकारी संजय ससाणे, वैद्यकीय अधिकारी डॉ पराग राठोड आदी उपस्थित होते. बैठकीत बँकांच्या अधिनस्त असलेल्या निष्क्रिय आधार किट्स तातडीने कार्यान्वित करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले. ण्प्टूेूए अंतर्गत नवजात बालकांची आधार नोंदणी वाढविण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष प्रयत्न करावेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले. पुढे बोलतांना जिल्हाधिकारी कुंभेजकर म्हणाले ,शालेय विद्यार्थ्यांच्या आधार नोंदणीस गती देण्यासाठी शिक्षण विभागाला शाळानिहाय वेळापत्रक तयार करून नियोजनबद्ध मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आले. प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यावरही भर द्यावा. मानोरा व मंगरूळपीर तालुक्यांमध्ये स्थलांतरित कामगारांचे प्रमाण अधिक असल्यामुळे त्यांच्या पाल्यांच्या आधार नोंदणीत अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले. जन्मदाखल्याअभावी प्रक्रिया अडखळत असल्याने संबंधित तहसीलदारांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून नोंदणी प्रक्रिया सुरळीत करावी, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी संबंधितांना दिले. तसेच, कमी व्यवहार असणाऱ्या आधार किट्सचा कारणनिहाय आढावा घेऊन त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले. आधार नोंदणीच्या प्रगतीवर सातत्याने लक्ष ठेवण्याचेही निर्देश दिले. बैठकीत तृतीयपंथीयांच्या आधार नोंदणीची स्थितीचा आढावा घेतला. या घटकांपर्यंत सेवा पोहचायला हवी. आधार नोंदणी झाली नसल्यास याचा समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून पाठपुरावा करावा असेही जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी सांगितले.

# रिसोड नगरीत भगवान महाविर जन्मकल्याणक सोहळा उत्साहात

## अहिंसा, सत्य आणि शांतीचा संदेश



रिसोड : जैनधर्मियांचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर स्वामी यांच्या २६२५ व्या जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त रिसोड नगरीत भक्ती, उत्साह आणि आध्यात्मिक वातावरणाचा संगम पाहायला मिळाला. संपूर्ण शहरात मंगलमय वातावरण निर्माण झाले होते आणि भाविकांनी मोठ्या श्रद्धेने या सोहळ्यात सहभाग घेतला.

यापवित्र दिनाचे औचित्य साधून श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिर येथून भव्य पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे काटेकोर पालन करत, शिस्तबद्ध आणि सुसंस्कृत पद्धतीने ही मिरवणूक पार पडली. पारंपरिक वेशभूषेत सजलेले भाविक, हातात ध्वज, पताका आणि धार्मिक घोषवाक्ये देत वातावरण अधिकच भारावून टाकत होते. या मिरवणुकीत ज्येष्ठ नागरिकांसह युवक-युवती आणि लहान मुला-मुलींचा उत्स्फूर्त सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. लहानग्यांच्या उत्साहाने आणि महिलांच्या सहभागाने मिरवणुकीला वेगळेच आकर्षण प्राप्त झाले होते. मिरवणूक जैन मंदिर, अप्पा स्वामी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चांदणी चौक अशा प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. मार्गक्रमणादरम्यान ठिकठिकाणी नागरिकांनी पुष्पवृष्टी करून मिरवणुकीचे स्वागत केले. तसेच काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व अल्पोपहाराचीही व्यवस्था करण्यात आली होती संपूर्ण परिसर 'भगवान महावीर स्वामी की जय' या घोषणांनी दुमदुमून गेला होता. या सोहळ्यामुळे शहरात बंधुता, शांतता आणि एकात्मतेचा सुंदर संदेश पसरला. मिरवणूक पुन्हा जैन मंदिरात परतल्यानंतर भगवान महावीर स्वामी यांचा विधीपूर्वक अभिषेक व पूजन करण्यात आले. यावेळी भाविकांनी मोठ्या श्रद्धेने प्रार्थना करून आपल्या जीवनात अहिंसा, सत्य आणि संयम यांचे पालन करण्याचा संकल्प केला. ता. प्र.

**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक ) | R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# भेटवस्तूंचा लोकार्पण सोहळा आणि सांस्कृतिक कार्यक्रम

रिसोड: जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा शेलगाव राजगुरे येथे सन्माननीय ग्रामस्थांनी दिलेल्या भेट वस्तूंचा लोकार्पण सोहळा आणि सांस्कृतिक कार्यक्रम अतिशय यशस्वीपणे पार पाडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाशिम जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष शिक्षणअधिकारी संजय ससाने , तर कार्यक्रमाचे उद्‌घाटक म्हणून वाशिम जिल्ह्याचे उपशिक्षण अधिकारी आदरणीय बिरादार हे होते. प्रमुख अतिथी म्हणून शिरपूर पोलीस स्टेशनचे वानखेडे ,खोडवे , वाशिम शिक्षक पतसंस्था विद्यमान संचालक मंचकराव तायडे ,गावचे ग्रामसेवक, सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, पोलीस पाटील,आणि शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांची विशेष उपस्थिती लाभली. सर्वप्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष



आणि प्रमुख पाहुणे यांनी महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन केले. दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

कार्यक्रमाला उपस्थित असलेले अध्यक्ष सर्व प्रमुख पाहुणे यांचा गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी यथोचित सत्कार केला. तदनंतर गावातील सुजान आणि जागरूक ग्रामस्थांनी शाळेच्या मूलभूत गोष्टींची पूर्तता म्हणून, स्वर्गीय भास्करराव देशमुख यांच्या स्मृती प्रित्यर्थ,एक उच्च प्रतीचे इन्व्हर्टर, गावातील प्रगतशील शेतकरी शिवाजीराव वाघ यांच्याकडून शाळेला चांगल्या क्वालिटीचे एक प्रिंटर, अल्पावधीतच पंचक्रोशीत नावाजलेले डॉक्टर अनंत भाग्यवंत यांच्याकडून शाळेला आहूजा कंपनीची साऊंड सिस्टिम,गावातील जागरूक नागरिक नारायणराव जी वाघ, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख गुलाबराव देशमुख ,प्रगतशीलशेतकरी नागोराव वाघ तर्फे प्रत्येकी एक असे कारागिराकडून बनवून घेतलेले तीन कपाट शाळेला भेट स्वरूपात दिले. गावचे तंटामुक्ती अध्यक्ष नामदेवराव जी वाघ यांच्याकडून नीलकमल कंपनीच्या सहा खुर्च्या आणि भागवत रावजी इंगळे यांच्याकडून शाळेला एक व्हाईट बोर्ड, तसेच गावातील जागरूक नागरिकांनी शाळेला आठ सिमेंटची बाखडे भेट दिले. या सर्व भेट वस्तूंचा मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण सोहळा पार पडला आणि सदरहू सुजान नागरिकांचा मान्यवरांनी यथोचित सत्कार केला.त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय ससाने यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये त्यांच्या बुद्धीचातुर्याने प्रेक्षकांना जिंकून घेतले. बालकांच्या विकासासाठी प्रत्येक पालकांनी काय करायला हवे , त्याला पालक आणि शिक्षकांची जोड कशाप्रकारे असायला हवी हे त्यांनी एका सुंदर आणि मार्मिक गोष्टीतून स्पष्ट केले. जिल्ह्यामध्ये राबवित असलेल्या उपक्रमाविषयी लोकांशी चर्चा केली.अभ्यासाशिवाय गत्यंतर नाही, असे त्यांनी इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना आवर्जून सांगून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. रमेश रावजी वाघ यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामधून शाळेची दशा आणि दिशा, शाळेला लागणाऱ्या मूलभूत गोष्टी, याविषयी विचार व्यक्त केले. त्यांनी प्रास्ताविकामधून शाळेत एका सहाय्यक शिक्षकाची जागा रिक्त आहे शाळेला संरक्षण भिंत आणि दोन वर्ग खोल्यांची नितांत गरज आहे. सर्व नृत्याला गावकऱ्यांनी भरभरून बक्षीसे दिली.असे एकूण १५४८० रुपये बक्षिसांची रक्कम झाली.सदरहू रकमेतून विद्यार्थ्यांसाठी स्कूल बॅग किंवा चांगल्या प्रतीची वाटर बॉटल विकत घेण्याचे ठरवले. शेवटी कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली.ता.प्र.

# अवकाळी पावसासह गारपीटीने 'हळद' पिकाचे नुकसान

कु-हा,आसोला येथिल शेतकऱ्यांचे नुकसान

रिसोडः रिसोड तालुका हा हळद पिकाचे उत्पन्न घेणारा तालुका म्हणून पुढे येत आहे. विशेष म्हणजे कु-हा,आसोला,जवळा,मांडवा, मोहजाबंदी,भर जहागीर सह आदी गावातील शेतकरी वन्यप्राण्यांच्या त्रासाला कंटाळून हळद पिकाकडे वळले आसतांनी हळद पिक शेतावर सुकण्यावेळीच ता. २ एप्रिल च्या रात्री झालेल्या आवकाळी पावसासह,गारपीटीने सुकत आसलेल्या हळदीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

तालुक्यातील शेतकरी पारंपारिक पिक पध्दतीला बगल देत नानाविध पिकाची लागवड करीत आहे. परंतु कधी



आसवानी,तर कधी सुलतानी संकटाने येथिल शेतक-यांचे हिरवे स्वप्न धुळीस मिसळत आसल्याचे विदारक चित्र दिसुन येते. मागील काही दिवसांपासून अवकाळी पावसाचा अंदाज खरा ठरला पणे नेमका हळद पिकाच्या मुळावरच आला. तालुक्यातील कु-हा,आसोला,भर जहागीर, मांडवा,जवळा,मोहजाबंदीसह आदी भागातील शेतक-यांनी हळद पिकाची काढणी करून योग्य ती प्रक्रिया करीत शेतावर हजारो क्विंटल हळद सुकण्यासाठी पांगुण ठेवली होती. परंतु ता. २ एप्रिल च्या रात्री अनेक गावा मध्ये अवकाळी पावसासह ,गारपीट झाल्याने पिवळी हळद पांढरी पडल्याने अतोनात नुकसान झाल्याची माहीती. कु-हा येथिल शेतक-यांनी दिली. या नुकसानाची प्रशासनाद्वारे योग्य पंचनामे करीत नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

> वन्यप्राण्यांच्या त्रासापोटी आमच्या परीसरामध्ये हळद पिकाकडे शेतकरी मोठ्या प्रमाणात वळले,हळद पिकाची काढणी करीत शेतावर पसर पडलेल्या हळदीवर अवकाळी पावसासह,गारपीट झाल्याने आता हळद पांढरी पडलेली दिसत आहे. याचा संबंधित विभागाने पंचनामा करून योग्य ती मदत करावी ही विनंती.
>
> देविदास नागरे
> हळद उत्पादक शेतकरी कुऱ्हा

# डिजिटल शेती शाळेतून जैविक व नैसर्गिक निविष्ठा निर्मितीचे मार्गदर्शन

## ८ एप्रिल रोजी सायं. ७:३० वा.; शेतकऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन

वाशिम ,दि.७ एप्रिल (जिमाका) कृषी विभाग, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प व पाणी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'डिजिटल शेती शाळा' या उपक्रमांतर्गत भाग-२ चे आयोजन बुधवार, दि. ८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७:३० वाजता करण्यात आले आहे. दिनांक १ एप्रिल रोजी झालेल्या पहिल्या सत्राला शेतकरी बांधवांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यानंतर, या दुसऱ्या सत्रामध्ये 'जैविक व नैसर्गिक निविष्ठा उत्पादन' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या सत्रात शेतकरी बांधवांना घरच्या घरी बीजामृत, जीवामृत, घन जीवामृत, लिंबोळी अर्क तसेच दशपर्णी अर्क यांसारख्या उपयुक्त निविष्ठा तयार करण्याचे प्रगत तंत्रज्ञान शिकविण्यात येईल. तसेच या निविष्ठांचे फायदे, वापराची पद्धत व त्यातून होणारे आर्थिक व पर्यावरणीय लाभ याबाबतही सखोल माहिती दिली जाणार आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शेती अधिक शाश्वत, कमी खर्चिक व उत्पादनक्षम करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे शेतकरी बंधू-भगिनी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच महिला बचत गटांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

ही डिजिटल शेती शाळा नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन व पाणी फाऊंडेशन यांच्या अधिकृत युट्युब चॅनेलवर थेट प्रक्षेपित करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सहाय्यक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, समूह सहाय्यक, कृषी ताई किंवा कृषी सखी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन वाशिम जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरीफ शाह यांनी केले आहे.

चला, हवामान बदलाला सामोरे जात, आपल्या शेतीला अधिक शाश्वत आणि समृद्ध बनवूया!

# अडोळी गाव विक्री, कर्जमाफी आंदोलनाचा वाशिम जिल्ह्यात तीव्र पडसाद; आंदोलनाला हिंसक वळण

**वाशिम** - जिल्ह्यातील तालुक्यातील अडोळी येथे सुरू असलेल्या 'गाव विक्री, कर्जमुक्ती' ठिय्या आंदोलनाचे पडसाद आता संपूर्ण जिल्ह्यात उमटू लागले असून आंदोलनाला दिवसेंदिवस उग्र स्वरूप प्राप्त होत आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे प्रशासन व शासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत विविध ठिकाणी संतप्त शेतकरी रस्त्यावर उतरले असून काही ठिकाणी आंदोलनाने हिंसक वळण घेतल्याचे चित्र समोर येत आहे.



वाशिम-रिसोड महामार्गावर शेतकऱ्यांनी टायर जाळून निषेध व्यक्त केला. आंदोलनकर्त्यांनी 'कर्जमाफी करा', 'शेतकऱ्यांना न्याय द्या',अशा जोरदार घोषणा देत वाहतुकीवर परिणाम केला. या अचानक उग्र झालेल्या आंदोलनामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, अडोळी येथील आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी जिल्ह्यातील विविध गावांमध्ये चळवळ उभारली जात आहे. काही गावांमध्ये ग्रामस्थांनी एकत्र येऊन निषेध नोंदवला, तर काही ठिकाणी शेतकरी रस्त्यावर उतरून जाळपोळ केल्याच्या घटना घडल्या आहेत. यामुळे प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे की, सततच्या नापिकी, वाढते उत्पादन खर्च आणि कर्जाच्या वाढत्या ओझ्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे 'गाव विक्री' हा टोकाचा निर्णय घ्यावा लागत आहे. शासनाने तात्काळ संपूर्ण कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

आंदोलनाची दखल शासनाने तातडीने घेतली नाही, तर हे आंदोलन एका गावापुरते मर्यादित राहणार नसून संपूर्ण वाशिम जिल्हा तसेच राज्यभर तीव्र स्वरूप धारण करू शकते, असा इशारा देखील शेतकरी नेत्यांनी दिला आहे. 'शेतकऱ्यांचे उग्र रूप सरकारला पाहावे लागेल,' अशी भावना आंदोलनातून व्यक्त होत आहे.

सध्याची परिस्थिती पाहता जिल्ह्यात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, येत्या काही दिवसांत शासनाची भूमिका काय राहते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी दिलासा

मुंबई, दि. १ : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत लाभ घेणाऱ्या महिलांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला असून ई-केवायसी दुरुस्तीसाठी ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, योजनेअंतर्गत ई-केवायसी प्रक्रियेची अंतिम तारीख ३१ मार्च २०२६ होती. मात्र राज्यात उद्भवलेले अवकाळी पावसाचे व गारपीटीचे संकट, तसेच लाभार्थी महिलांकडून झालेली मागणी यांचा विचार करून ही मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या सूचनेनुसार घेण्यात आला आहे. अधिकाधिक पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळावा आणि कोणत्याही महिलेची गैरसोय होऊ नये, या उद्देशाने ही मुदतवाढ देण्यात आली आहे. ज्या महिलांच्या अर्जामध्ये त्रुटी आहेत किंवा ई-केवायसी अपूर्ण आहे, ज्यांची चुकीची माहिती भरली गेली होती किंवा तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले होते अशा महिलांना ई-केवायसी दुरुस्ती करण्यासाठी अतिरिक्त कालावधी उपलब्ध करून दिला आहे. त्यांनी ३० एप्रिल पर्यंत प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

# अडोळी येथील गाव विक्री आंदोलनातील मागण्या मुख्यमंत्री कडे मांडू - खा.संजय देशमुख

**वाशिम** - तालुक्यातील अडोळी येथे गेल्या दि.२ एप्रिल २०२६ पासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर कर्ज माफी सरसकट द्या,पीक वीमा लागू करा.सातबारा कोरा करा.एम आय डी सी प्रकल्प सुरू करावा.इत्यादी मागणी साठी चक्क गाव विक्री करून कर्ज माफी करावी म्हणून ठीया आंदोलन सुरू केले आहे.

या आंदोलनाला महसूल चे तलाठी, मंडळ अधिकारी,व ग्रामपंचायत अधिकारी कृषी विभाग आणि तहसिलदार,यांनी देखील ठीया आंदोलनाला भेट देवून आंदोलन कर्ते शेतकरी यांचेशी चर्चा केली. परंतु चर्चा समयी आंदोलन कर्त्याचे समाधान झाले. दि.४ एप्रिल रोजी वाशीम यवतमाळ लोकसभा खासदार संजय देशमुख यांनीही भेट दिली.भेटी दरम्यान त्यांनी चर्चा केली.आणि आपल्या भाषणात सांगितले की, तुमच्या मागण्या ह्या रास्त असून शासनाने कर्ज माफीची केलेली घोषणा ही फसवेगीरीची असून या कर्ज माफी मध्ये सर्वच शेतकऱ्यांना लाभ मिळणार नाही. त्यामुळे मी आपला लोकप्रतिनिधी म्हणून आपल्या सोबत



आहे. शिवाय माझा पक्ष आणि कार्यकर्ते सुद्धा सोबत आहे. मी आपल्या मागण्या स्वतः कृषी मंत्री व पालक मंत्री दत्ताभाऊ भरणे यांना भेटून व मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस यांना भेटून मागण्या संदर्भात पत्र देणार आहो. यावेळी खा.संजय देशमुख यांचे सोबत शिवसेना बाळासाहेब ठाकरे चे डॉ.सिद्धार्थ देवळे, अडोळी जि.प.चे सदस्य दिलीपराव देशमुख, यांचेसह अनेकांची उपस्थिती होती. यावेळी वाकद येथील शेतकऱ्यांनी अडोळी येथील ठीया आंदोलनास पाठिंबा दिला आहे. तर राजीव गांधी पंचायतराज अभियान जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे यांनी स्वतः आंदोलन स्थळी भेट देवून लेखी पाठींबा दिला आहे. तर नागठाणा येथील शेतकऱ्यांनी वाशीम रिसोड रोडवर जमाव करून शासनाचा टायर जाळून निषेध केला आहे. आणि मंगरूळपीर तालुक्यातील गोगरी येथील शेतकऱ्यांनी ठीया आंदोलन स्थळी येवून जाहीर पाठिंबा दिला. व शासनाच्या फसवे कर्ज फाफीचा निषेध केला आहे. त्यामुळे अडोळी येथील शेतकऱ्यांनी ठीया आंदोलना जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा जाहीर पाठिंबा मिळत असून आंदोलन आणखी तीव्र होतांना दिसत आहे.

# गॅसच्या दरवाढीमुळे ग्रामीण भागात पुन्हा पेटल्या चुली

**रिसोड** : ग्रामीण भागात गॅसचा प्रश्न अडचणीत आला आहे. ग्रामीण भागात परंपरेच्या पुन्हा चूली पेटल्या आहे गॅस ग्रामीण भागात वेळेवर मिळत नाही. स्वयंपाक करताना महिलांची डोके दुःखी वाढली आहे. ग्रामीण भागात वेळेवर गॅस मिळत नाही. चुलीसाठी सरपन मिळत नाही. ग्रामीण भागात घरोघरी चुली बंद पडल्या, कारण गॅस महिलांना उज्वला गॅस योजना आहे.

आता युद्धामुळे देशावर संकट आले. गॅस बुकीग झाल्यावर १० ते १५ दिवसानी गॅस मिळतो पण तो पर्यंत महिलांनी स्वयंपाक कश्यावर करायचा असा,



प्रश्न समोर येत आहे.

ग्रामीण भागात महिला चुलीवर स्वयंपाक करण्यासाठी सरपण मिळण्यासाठी धावपळ करावी लागते. सरपनाचे भाव वाढत जात आहे. गॅसच्या दरापेक्षा सरपनाचे भाव जादा आहे. चुलीच्या त्रासामुळे महिलाना डोळयांना त्रास होत असून यामुळे आजाराचे प्रमाण वाढत असते.

# चिंचाबाभर येथे विजेच्या कडकडाटात दोन म्हशींचा मृत्यू

## शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

रिसोड : तालुक्यातील चिंचाबाभर परिसरात झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. यादरम्यान झालेल्या वीजपातामुळे झाडाखाली बांधलेल्या दोन दुभत्या म्हशींचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे संबंधित शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

?मिळालेल्या माहितीनुसार, चिंचाबाभर येथील शेतकरी महादेव सानप यांनी आपल्या म्हशी नेहमीप्रमाणे शेतात गोठ्याजवळ बांधल्या होत्या.



दुपारच्या सुमारास अचानक वातावरणात बदल झाला आणि विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. यावेळी कडाडलेली वीज थेट म्हशींच्या अंगावर पडली, ज्यामध्ये दोन्ही म्हशींचा जागीच मृत्यू झाला. शेतकरी महादेव सानप या शेतकऱ्यावर गंभीर आर्थिक संकट निर्माण झाले आहे.

यांच्याकडे १ हेक्टर ६० आर जमीन आहे. याबाबत महसूल प्रशासनाने पंचनामा केला आहे. यावेळी प्रशासनाने आर्थिक मदत करावी. यासाठी गावातील तलाठी रवींद्र खंडारे, रिसोड चे पशुसंवर्धन अधिकारी अहिरे यावेळी पंचनामा करताना उपस्थित होते. यांनी यासाठी शेतकरी महादेव सानप या शेतकऱ्याला सहकार्य करावे व मृत पावलेल्या म्हशीचा अहवाल वरिष्ठांकडे द्यावा. अशी मागणी शेतकरी महादेव सानप यांनी यावेळी केली आहे. या म्हशीचे अंदाजे नुकसान ७०-८० हजारांचे जवळपास असून दुभत्या म्हशी असल्याने आर्थिक नुकसान झाल्याचे कुटूंबाचे म्हणणे आहे. ता.प्र.



# शहरासह ग्रामीण भागात हिंदू संमेलन उत्साहात

रिसोड, दि. ५ (प्रतिनिधी)

शहरातील स्वामी विवेकानंद वस्ती, स्वामी समर्थ महाराज वस्ती, छत्रपती शिवाजी महाराज वस्ती या भागासह तालुक्यातील रिठद, हराळ,लोणी,एकलासपूर, गोवर्धन या मंडळात ३ एप्रिल रोजी विशाल हिंदू संमेलन उत्साहात पार पडले. या संमेलनात प्रमुख वक्ते म्हणून धनंजय मोरे महाराज,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अकोला- वाशीम विभाग प्रचार दिपक बडमे, वाशीम जिल्हा कार्यवाह संदीप घुगे व ॲड. श्वेता खंडेलवाल उपस्थित होते.

यावेळी बदलत्या सामाजिक परिस्थितीत संस्काराचे महत्व अधिक अधोरेखित होत असून सुदृढ आणि संस्कार कुटुंब निर्माण करणे ही काळाची गरज आहे. हे कार्य प्रभावीपणे पार पाडण्याची क्षमता केवळ मातेमध्येच आहे. असे प्रतिपादन मंगलवाडी येथील धनंजय महाराज मोरे यांनी केले. ते रिसोड शहरातील हनुमान मंदिर येथे छत्रपती शिवाजी महाराज वस्तीच्या वतीने आयोजित हिंदू संमेलनात बोलत होते. तर, दिपक बडमे यांनी रिठद येथे मार्गदर्शन करताना पंच परिवर्तन या संकल्पनेवर प्रकाश टाकला. त्यांनी समरसता, पर्यावरण संवर्धन, स्वदेशीचा स्वीकार, कुटुंब प्रबोधन आणि नागरिक कर्तव्य या पाच महत्त्वाच्या घटकांमुळे देशाची सर्वांगीण प्रगती जबाबदाऱ्या ओळखून त्यानुसार वर्तन केले तर, भारत देश अधिक सक्षम आणि प्रगती होईल असे मत व्यक्त केले. या हिंदू संमेलनाला मोठ्या संख्येने हिंदू तरुणांची उत्स्फूर्तीने उपस्थिती लावली होती.

# उन्नती ग्रुपची महिला प्रदर्शनी; रिसोडमध्ये महिलांचा प्रतिसाद

रिसोड : स्थानिक उन्नती ग्रुपच्या वतीने २९ मार्चला जीबी लॉन येथे महिला प्रदर्शनी व विविध आकर्षक स्टॉलचे आयोजन करण्यात आले. गेल्या १३ वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविला जात असून, या प्रदर्शनीला महिलांचा प्रतिसाद लाभला.

यावर्षी आयोजित प्रदर्शनीत सुमारे ५५ स्टॉल उभारण्यात आले होते. दुपारी सुरू झालेली ही प्रदर्शनी रात्री उशिरापर्यंत सुरू होती. यामध्ये कपडे, साड्या, दागिने, तसेच महिलांच्या शृंगार व दैनंदिन वापरातील वस्तूंसह विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल आकर्षण ठरले. उन्नती ग्रुपच्या कांचन जिरवणकर, अमृता जिरवणकर, श्वेता जिरवणकर, सुनीता जिरवणकर व शीतल जिरवणकर यांच्या पुढाकारातून



हा उपक्रम राबविण्यात आला. उन्नती ग्रुपच्या सर्व सदस्यांनी सांगितले की, महिलांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांना स्वावलंबी बनण्याची संधी मिळावी, यासाठी ही प्रदर्शनी आयोजित केली असल्याचे सांगितले. सदर महिला प्रदर्शनी कार्यक्रमाला भाजपा महिला संघटिका अमृता देशमुख यांनी भेट देऊन सदर कार्यक्रमाचे कौतुक करून उन्नती ग्रुपच्या सर्व महिला सदस्यांना शुभेच्छा दिल्या

# रिसोडच्या एन.सी.सी.कॅडेटस्च्या वतीने भगवान महावीर यांना आदरांजली

रिसोडः जैन धर्माचे २४वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त स्थानिक श्री शिवाजी विद्यालय व क महा रिसोड शाळेतील एन.सी.सी.कॅडेटस् च्या वतीने एन.सी.सी.चे सी.टी.ओ.प्रा. अभिजीत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली भगवान महावीर यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.



कार्यक्रमाच्या सुरवातीला शाळेचे प्राचार्य मा. संजाबराव देशमुख, उपप्राचार्य मा संजयराव नरवाडे, माजी उपप्राचार्य मा. सुशीलकुमार सोईतकर जेष्ठ शिक्षिका सौ. शोभा राऊत मॅडम यांच्या हस्ते भगवान महावीर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी प्राचार्य संजाबराव देशमुख यांनी भगवान महावीर यांच्या जीवनावर प्रकाश टाकून महावीरांनी दिलेली जीवनमूल्ये आपल्या वैयक्तिक जीवनात आत्मसात करून जीवन सार्थकी लावावे असे आव्हान केले. तसेच जेष्ठ शिक्षिका सौ शोभा राऊत मॅडम यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. ज्यानंतर शाळेतील एन.सी.सी. चे सी.टीओ. प्रा. अभिजित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील एन.सी.सी. कॅडेटस् नी परेड द्वारे भगवान महावीर यांना आदरांजली अर्पण केली. या कार्यक्रमास शाळेतील सर्व प्राध्यापक,। शिक्षक,शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डिगांबर पाचरणे यांनी केले.(वि. प्र)